शोध पत्र

# आदिवासी लोकसाहित्य

* प्रा. डॉ. सुनिल आनंदराव राठोड

* श्रीमती कोकाळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर जि . अमरावती

**प्रस्तावना -:-**

जगातील इतर देशाप्रमाणे भारतातही आदिवासी जमात मोठयाप्रमाण आढळुन येते. आदिम म्हणजे लोकजीवनाचे प्राचिनतम स्वरुप होय. या आदिवासी जमातीचे वास्तव्य साधारणत:दऱ्याखोऱ्यात, डोंगराळ भूप्रदेशात आढळुन येते. महाराष्ट्रात या आदिवासीच्या एकूण ४७ जमाती आहेत. आदिवासी या शब्दाचा मराठी साहित्यातील अभ्यासकांनी वेगवेगळा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, ''विशिष्ट भाषा बोलण्याऱ्या,विशिष्ट जीवनपध्दतीनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्षे जंगल-पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्य जोपासणाऱ्या मानवसमूहाची ओळख करुन देण्यासाठी आदिवासी हा शब्द वापरला जातो.'' 2 सर्वसाधारणपणे नागर संस्कृतीपासुन अलिप्त राहिलेला मूळ चा रहिवासी म्हणजे मूळ निवासी होय. तसेच गोविंद गारे म्हणतात,'' भौगोलिक दृष्टया इतरापासून नेहमीच दूर म्हणजे गिरिकंदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी ''२ आदिवासींसाठी 'वनवासी' 'वन्य जमाती,' 'वनपुत्र,' 'आदिपुत्र,' 'आदिम,' 'जंगलाचे राजे' असे अनेक शब्द वापरले जातात. 'आदिवासी प्रश्न ' या पुस्तकात गोविंद गारे म्हणतात,'सर्वसामान्य आदिवासी हा भोळाभाबडा,अबोल, अलग त्रयस्थाबरोबर शक्यतो बोलण्याचे टाळणारा, प्रमाणिक, पापभिरु, दैववादी, परंपरागत जीवनदृष्टीचा, निसर्गसान्निध्यात रमणारा, निसर्गावर प्रेम करणारा..... त्याची जीवनाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी आहे. त्याच्या जीवनात पैशाला फार स्थान नाही. जमीन गुरेढोरे, बकऱ्या, कोंबडया,मासे,खेकडे व श्रम करण्यासाठी मजबूत हातपाय हीच त्याची संपत्ती. आपणास हवे ते निसर्गातून व सभोवतालच्या साधनातून मिळविण्याची शक्यता असेल तर आदिवासी स्वत:ला अत्यंत सुखी समजतो' यावरुन असे म्हणता येईल की,हा आदिवासी निसर्गाधिष्टित, निसर्गाशी एकरुप व निसर्ग हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे दिसुन येते.

अशा आदिवासी जमातीच्या साहित्याचा वेध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करता येईल. ''१९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि नंतर बहुजनांच्या आणि दलितांच्या उध्दारासाठी महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातुन उदयास आलेल्या सामाजिक चळवळी आदिवासी साहित्याला प्रेरणा देणाऱ्या ठरल्या आहेत. आदिवासी साहित्य चळवळीला प्रेरणेत बहुजन आणि दलित चळवळीचा सिंहाचा वाटा आहे हे मान्य करावे लागते.'' 3 सुरवातीचे मराठी साहित्य हे प्रस्थापितांचे मराठी साहित्य आहे. या साहित्याने मोठया प्रमाणावर ज्या मानव समूहाचे अस्पर्श असलेले जीवन आहे ते घेऊन येणारे दलित साहित्य आणि त्यानंतर आत्मभान घेऊन आलेले आदिवासी साहित्य आपला ठसा उमटवतांना दिसते. आदिवासी साहित्यात 'आदिवासी लोकसाहित्य' हा एक भाग आहे. यात आदिवासी लोकगिते, लोककथा, म्हणी, उखाणे, दोहे, इत्यादीचा समावेश होतो हे लोकसाहित्य आदिवासी जमातीने मौखिक परंपरेने आणि पारंपारिक पध्दतीने आपल्या तळहातावरच्या फोडा प्रमाणे जोपासले आहे. या लोकसाहित्यातून उलगडणारे आदिम जीवन त्यांच्या संपूर्ण वैशिष्टयांसह साकार होताना दिसते. मराठी अभ्यासकांनी आदिवासीच्या लोकसाहित्याचा मौखिक परंपरेने चालणारा ठेवा अतिशय मेहनतीने शब्दबध्द करुन ठेवला आहे. यामध्ये पुरुषाच्या लोकगीतापेक्षा स्त्रीयांची लोकगीते विपूल प्रमाणात आहेत तसेच स्त्रियांच्या लोकगीतांचे विषयही अनेक आहेत जसे सण-उत्सव, विवाहविधी, जन्म-मृत्यु प्रसंगी म्हटली जाणारी गीते, संसारातील विविध अनुभव, आर्थिक ओढाताण, दारिद्र्य, अंगाई गीते इत्यादी असा हा आदिवासीच्या लिखित साहित्यापेक्षा मौखिक साहित्याचा आवाका फार मोठा आहे. ''ज्या साहित्यात आदिवासींच्या जीवनजाणिवा, भाषा,त्यांची एकुण संस्कृती याचा अंतर्भाव असेल मग ते मौखिक असो की लिखित स्वरुपात,- त्याला आदिवासी साहित्य म्हणून ओळखतो.'' 4 अशा आदिवासी लोकसाहित्याच्या लोककथा, लोकगीते, सण उत्सवाची गाणी, विधीनाट्य इ. या एका एका प्रकारावर मोठयाप्रमाणावर संशोधन होऊ शकते.

महाराष्ट्रात आदिवासी लोकगीतांचा, लोककथांचा, लोककलांचा अभ्यास फार मोठया प्रमाणात झालेला नाही.आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. काही मोजक्या लोकांनी आदिवासी साहित्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते त्यात डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. दुर्गा भागवत, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. अल्का हिवराळे, रा.चि. शेंडे, डॉ.तारा भावळकर, डॉ. सुदाम जाधव यांचा उल्लेख करावा लागेल तसेच संकलनाच्या दृष्टीने वामन चोरघडे, सरोजनी बाबर, ना.रा. शेंडे यांचे प्रयत्न आदिवासी साहित्य अभ्यासकास प्रेरणादायी आहे. याचबरोबर डॉ. विनायक तुमराम, डॉ. गोविंद गारे, गंगाराम जाणू इत्यादी साहित्यकांने आदिवासी लोकसाहित्यात मोलाची भर घातली आहे.

आदिवासी साहित्य जीवनवादी असून एकूणच त्यांच्या जीवनातील सुख दु:खाना, चालीरीती, रुढी परंपरा, परंपरागत लोकनृत्य, वाद्ये, लोकगीते,लोककथा,लोकनाटय, जादुटोणा यासारख्या

सर्वच बाबींचे प्रतिबिंब आदिवासी साहित्यात उमटलेले आहे. त्याचबरोबर अनेक क्षेत्रातील संशोधनही गतीमान होतांना दिसून येते. आदिवासी जीवनाचा समावेश साहित्यामध्ये आत्मानूभूतीतून होतांना दिसतो. मात्र त्यामानाने त्यांच्या जीवनात फारसे बदल घडून येताना दिसत नाही.

आदिवासी लोकसाहित्य वंचिताचे साहित्य आहे जे दुर्लक्षित राहिले. त्याचा विद्रोह,आक्रोश, वेदना आदिवासी साहित्याच्या रुपाने आकारास आले. हे साहित्य व्यापक स्वरुपाचे आहे. जगातील सर्वच आदिवासी जमातीच्या जीवन जाणीवांचा समावेश आदिवासी साहित्यात होत आहे. त्यांची जीवनदृष्टी, जीवनानुभूती अकृत्रिम वर्तन, निसर्ग निष्ठा याचे प्रतिबिंब आदिवासी साहित्यामध्ये दिसून येते.

आदिवासींच्या सांस्कृतिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतो आणि ती नवी पिढी तो वारसा अतिशय निष्ठापूर्वक जपत असते. परंतु आज या जमातीची लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला यांचा ऱ्हास होताना दिसते. या आदिवासी संस्कृतीचे जतन करणे ही काळाची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ

१. तुमराम डॉ. विनायक, “आदिवासी साहित्य स्वरुप आणि समिक्षा,” विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९४, पृ.६
२. गारे गोविंद, “भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती,” अमृत प्रकाशन, औरंगाबाद,प्रथमावृत्ती १९९३,पृ.८७
३. “आदिवासी मराठी साहित्य स्वरुप आणि समस्या,” संपादक-डॉ.प्रमोद मुनघाटे पृ. ८
४. मुनघाटे डौ. प्रमोद, “आदिवासी मराठी साहित्य” (संपा ) प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७, पृ.५०